## मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची मा.निवासी उप-जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४/०७/२०१९ रोजी झालेल्या **बैठकीचे ईतिवृत्त...**

मा. अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली व मा. निवासी उपजिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक. ०४/०७/२०१९ रोजी सकाळी. ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदीपट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाच्या सभासदांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकी करिता उपस्थित सदस्यांची यादी सोबत जोडत आहे. (सहपत्र-१).

सर्व प्रथम प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदीपट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची स्थापना करण्यात आलेली असून दलाच्या कार्य कक्षेबाबतची माहिती सर्व सदस्यांना दिली. महाराष्ट्र राज्यातील ५३ प्रदूषित नदीपट्ट्यांपैकी वडसा (देसाईगंज) तेआष्टी हा नदीपट्टा प्रदूषित पट्टा प्राथम्य क्र. II मध्ये असून त्याबाबतचा कृती आराखडा मंडळाने तयार केलेला असून तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आलेला आहे. बैठकी दरम्यान या प्रदूषित नदी पट्ट्याकरिता जबाबदार असलेले भागधारक जसे की, गडचिरोली नगरपरिषद, गडचिरोली, वडसा (देसाईगंज) नगरपरिषद, वडसा (देसाईगंज) व आष्टी ग्रामपंचायत, आष्टी या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच या नदीलगतअसलेल्या उद्योगांबाबतची सविस्तर माहिती विषद केली.

| अ. क्रं. | बैठकीतील मुद्दा | दिलेले निर्देश | संबंधित यंत्रणा | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रदूषित नदी पट्ट्यातील वाळू उत्खननावर प्रतिबंध करण्याबाबत. | जिल्हाखनिकर्म अधिकारी यांचे प्रतिनीधी यांनी सदर वैनगंगा नदीपटयातील प्रदूषित नदी पट्ट्यामधिल वाळू उत्खननाकरिता ३० सप्टेंबर २०१९ पर्यत वैध असलेले वाळू लिलाव एकुण ३१ पैकी ११ वाळूधारकांना मंजूर करण्यांत आलेले आहेत असे सांगितले. सदर ठिकाणी | जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वाळू उत्खनन चालू आहे. बैठकीस उपस्थित मा. अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी सांगितले की, सदर क्षेत्रात नदीचे पात्र खुप मोठे असून भौगोलिक परिस्थितीनूसार नदीमध्ये मोठया प्रमाणात मुरुम, माती वरच्या भागातून वाहात येत असल्यामुळे रेती/वाळूचा मोठया प्रमाणात साठा निर्माण होतो. सदर वाळू साठयाचा उपसा जर केला नाही तर सदर नदीपात्रामध्ये मोठया प्रमाणात रेती/वाळू जमा होत राहिल्यास नदीचे पात्र उथळ होवून आजु बाजूच्या परिसरात पूरसदृष्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या बाबीचा तांत्रिक पध्दतीने अभ्यास होणे गरजेचे वाटते. असे बैठकीमध्ये सुचित केले. | | |
| २ | प्रदूषित नदी पट्ट्याकरिता जबाबदार असलेले भागधारकांची बैठक आयोजित करण्याबाबत. | मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली, मुख्याधिकारी, नगर परिषद गडचिरोली, नगर परिषद वडसा (देसाईगंज), ग्रामविकासअधिकारी, ग्रामपंचायत, आष्टी, तसेच सदर नदी पटयातील उ'द्योग जसे की, मे. वायुनंदना पॉवर लि.,कनेरी, जि. गडचिरोली मे. बल्लारपूर पेपर इंडस्ट्रिज,आष्टी, जि.गडचिरोली, मे. ए..ए. एनर्जी देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली या सर्व भाग धारकांची बैठक दिनांक २४.०७.२०१९ ला सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे आयोजित करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मंडळाने तयार केलेल्या कृती आराखड्याची सॉफ्ट कॉपी सर्व सभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्या बाबत. | मंडळाने तयार केलेल्या कृती आराखड्याची सॉफ्ट कॉपी सर्वसभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्याबाबत. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | तात्काळ |

मा. अध्यक्षांचे पुर्व परवानगीने बैठक समाप्त करण्यांत आली.

प्र. प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

निवासी उप-जिल्हाधिकारी,
गडचिरोली

# हजेरीपट

मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची मा. निवासी उप-जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठक दि. ०४/०७/२०१९.

| अ. क्र. | अधिकारी यांचे नांव व पदनाम | भ्रमणध्वनी क्रं. | ई-मेल | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | सुधाकर कुळमेथे<br>अपर जिल्हाधिकारी | 8888805622 | | |
| २ | धनाजी पाटिल<br>उपविभागीय अधिकारी | ९४२२४३६०४० | rdcgad@gmail.com | |
| 3 | दिपरतन गायकवाड<br>पु. पोलीस उपअधीक्षक (गृह) | 9422620175 | dipratang10@gmail.com | |
| 4 | वसीम खान<br>District Court Manager, Gad. | 9673451848 | dlsagad@gmail.com | 4/7/19 |
| 5. | प्रताप जगताप | | | |
| 6 | अतुल सातफळे | 9822228177 | | |
| 7 | राजेंद्र पा. सूर्यवंशी<br>क्षेत्र अधिकारी | 9423912117 | | 4/7/2019 |
| 8 | एस. आर. कावडे अ.का. [illegible] | 9422995212<br>~~942299~~ | | |
| 9 | मंगेश प्र. मुद्दमवार<br>जिल्हा न्यायालय, गड. कनिष्ठ लिपिक | 9373914979 | | 4/7/2019 |
| | | | | |